लोकमत

# 'उत्तेजक'ला उत्तेजन नको!

क्रीडा विश्वातून



सुनील वालावलकर
क्रीडा संघटक

**आधुनिक वैद्यकशास्त्रातील नवनवीन शोधांमुळे, चाचणीत सापडणार नाहीत अशाही उत्तेजकाचा वापर होत असतो. वैद्यकशास्त्र किंवा अन्य तंत्रविज्ञान क्षेत्रामधील प्रगतीबरोबरच नव्या फसवणुकीच्या घटनासुद्धा विकसित होत असतात.**



**इटलीचा टेनिसपटू** यानिक सिन्नर याला उत्तेजक द्रव्य घेतल्याप्रकरणी दोषी ठरवून जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संघटनेने (वाडा) त्याच्यावर तीन महिन्यांची बंदी घातली. जागतिक क्रमवारीत यानिक अव्वल स्थानी असल्यामुळे या शिक्षेचा निर्णय वादात सापडणे आणि बंदी असलेले उत्तेजक नेमक्या कशाप्रकारे यानिकच्या शरीरात गेले, याची चौकशी सुरू झाली. उपलब्ध माहितीनुसार, यानिकच्या मसाजरचे बोट कापलं गेलं होतं. त्यावेळी त्याने तात्पुरता उपाय म्हणून एक स्प्रे वापरला, ज्यामध्ये बंदी असलेले 'कॉस्टेबेल' नावाचं उत्तेजक द्रव्य होतं. पुढे स्प्रे मारलेल्या बोटांनी त्याने यानिकला मसाज दिला आणि त्यावेळी त्याच्या बोटाद्वारे 'कॉस्टेबेल'चे काही अंश यानिकच्या शरीरात गेले. हा घटनाक्रम बघता, यात यानिकची चूक आहे, असा निष्कर्ष काढता येत नसल्याने केवळ तीन महिन्यांच्या बंदीने हे प्रकरण निकालात निघाले. परंतु, या घटनेमुळे खेळाडूंना किती पराकोटीची काळजी घ्यावी लागते, याचे भान आले.

अजाणतेपणीसुद्धा बंदी असलेले उत्तेजक द्रव्य खेळाडूंच्या शरीरात संक्रमित होऊ शकतं, हे वास्तव सिन्नरच्या या ताज्या प्रकरणातून समोर आल्याने खेळाडूंमध्ये चिंतेचे वातावरण पसरलं आहे. सर्दीवर उपाय म्हणून नाकात फवारण्याच्या स्प्रेमध्येही बंदी असलेले उत्तेजक असू शकते. सध्याच्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या खेळाडूंना सदैव जागृत राहण्याशिवाय पर्याय नाही. क्रीडा क्षेत्र उत्तेजकमुक्त ठेवण्याच्या 'वाडा'च्या कडक धोरणापायी अनेक खेळाडूंची कारकीर्द धोक्यात आली आहे. अर्थात बंदी असलेल्या उत्तेजकाचा वापर ही क्रीडा क्षेत्राला लागलेली कीड असल्यामुळे सर्व क्षेत्रांमधून 'वाडा'ला पाठिंबा मिळत असतो.

येनकेन प्रकारे प्रतिस्पर्ध्यावर मात करण्याच्या इर्षेने झपाटलेले खेळाडू, उत्तेजकाच्या आहारी जाऊन स्वत:चं आरोग्य आणि कारकीर्द पणाला लावतात, याची अनेक उदाहरणे उघडकीस आली आहेत. फुटबॉलपटू मॅराडोना, सायकलपटू लान्स आर्मस्ट्राँग, क्रिकेटपटू शेन वॉर्न, टेनिसपटू आंद्रे आगासी यासारख्या दिग्गज खेळाडूंनी उत्तेजकाच्या नादी लागून आपलं सर्वस्व गमावलं. ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवल्यानंतर उत्तेजक चाचणीत नापास झाल्याने पदके काढून घेतलेल्या आतापर्यंतच्या खेळाडूंची संख्या १३० एवढी आहे. यात धावपटू बेन जॉन्सन, मेरियन जॉनससारख्या खेळाडूंचा समावेश आहे. ज्या उत्तेजकांवर बंदी आहे, अशा पदार्थांपासून खेळाडूंनी स्वत:ला दूर ठेवले पाहिजे, यासाठी 'वाडा' खूप प्रयत्नशील आहे. परंतु, त्यांचे निर्णय पक्षपाती असतात, अशी टीकाही 'वाडा'ला सहन करावी लागते. उत्तेजकाच्या वापरापासून क्रीडा क्षेत्र मुक्त ठेवण्याचा कितीही प्रयत्न 'वाडा' करत असली, तरीही प्रत्येकवेळी 'वाडा'ला यश मिळतंच, असे नाही.

